RNI No. MAHBIL /2009/31747

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक–ल

वर्ष ६, अंक ६] शुक्रवार, जानेवारी ३१, २०२०/माघ ११, शके १९४१ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १६.००

**असाधारण क्रमांक ११**

**प्राधिकृत प्रकाशन**

**(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.**

**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक ३१ जानेवारी २०२०

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७.**

क्रमांक एमएसए-०७/२०१६/प्र.क्र. २१८ II/कामगार-१०.—ज्याअर्थी, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा. ६१) याच्या कलम ११ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक एमएसए/०७/२०१६/प्र.क्र. २१८/कामगार-१०, दिनांक १९ डिसेंबर २०१७ या अन्वये महाराष्ट्र शासनाने, यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निरनिराळ्या वर्गाच्या आस्थापना सुरू करण्याची आणि बंद करण्याची वेळ निश्चित केली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, जनहितार्थ संपूर्ण वेळ म्हणजेच दिवसाचे २४ तास, थिएटर आणि सिनेमा प्रदर्शित करणारी गृहे खुली ठेवण्यास परवानगी देण्याचे ठरविले आहे, म्हणून उक्त अधिसूचनेच्या कक्षेतून थिएटर आणि सिनेमा प्रदर्शित करणारी गृहे यांना वगळणे इष्ट आहे ;

त्याअर्थी, आता महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा. ६१) याच्या कलम ११ द्वारे तसेच महाराष्ट्र सर्वसाधारण व वाक्खंड अधिनियम (१९०४ चा १) याच्या कलम २१ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून,

महाराष्ट्र शासन, याद्वारे, शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक एमएसए/०७/२०१६/प्र.क्र. २१८/काम-१०, दिनांक १९ डिसेंबर २०१७ यात पुढील सुधारणा करीत आहे :—

उक्त अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचितील अनुक्रमांक ३ मधील थिएटर आणि सिनेमा प्रदर्शित करणारे गृहे यांच्याशी संबंधित नोंद स्तंभ (३) मध्ये त्याच्या समोर विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र आणि स्तंभ (५) मध्ये विनिर्दिष्ट केलेली बंद करण्याची वेळ, या नोंदी वगळल्या आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेश कुमार,**
शासनाचे प्रधान सचिव.

## INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032
dated the 31st January 2020.

*NOTIFICATION*

Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment And Conditions of Service) Act, 2017.

No. MSA. 07/2016/CR-218 II/LABOUR-10.—Whereas, the Government of Maharashtra *vide* Government Notification, Industries, Energy and Labour Department, No. MSA. 07/2016/CR-218/Lab-10, dated the 19th December 2017 issued, in exercise of the powers conferred by section 11 of the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 2017 (Mah. LXI of 2017), has fixed the hours for opening and closing of different classes of establishments specified in column (2) of the Scheduled appended hereto ;

And Whereas, the Government of Maharashtra in the interest of public has decided to give permission to open the Theatres and Cinema Exhibition Houses all time that means 24 hours of a day therefore considers it expedient to exclude the Theatres and Cinema Exhibition Houses from the purview of the said Notification ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by section 11 of the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 2017 (Mah. LXI of 2017), read with section 21 of the Maharashtra General Clauses Act (1 of 1904), the Government of Maharashtra hereby amends the Government Notification, Industries, Energy and Labour Department, No. MSA.07/2016/C.R. 218/Lab.10, dated the 19th December 2017, as follows, namely :—

Entry at serial No. 3 in the Schedule appended to the said Notification, relating to Theatres and Cinema Exhibition Houes, area specified against it in column (3) and hours for closing specified in column (5) are deleted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJESH KUMAR,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.